# NUTA BULLETIN

FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION

Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10

**YEAR : 24 )** **15th April, 1999** **( NO : 4**


*कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची वरिष्ठ महाविद्यालयात अधिव्याख्याता पदावर नियुक्ती झाल्यावर करावयाची वेतननिश्चिती*

## महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग

***शासन निर्णय क्रमांक एनजीसी-१२९८/लोकायुक्त/(४५२९)/विशि-४ : मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२ : दिनांक : १ मार्च १९९९***

**शासन निर्णय :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार व शासनाने मंजूर केलेल्या सेवाशर्तीनुसार वरिष्ठ महाविद्यालयात अधिव्याख्याता पदावर नियुक्ती करतांना जाहिरात देऊन विहित अर्हता धारण करणाऱ्या व निवड समितीच्या माध्यमातून निवड झालेल्या उमेदवारांना अधिव्याख्याता पदावर नियुक्ती दिली जाते. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, वरिष्ठ महाविद्यालयात अधिव्याख्याता पदावर नियुक्ती होण्यास पात्र ठरणारे कर्मचारी हे कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक पदावर सेवा केल्यानंतर अधिव्याख्याता पदाकरिता आवश्यक असणारी अर्हता धारण करून व निवड समितीच्या माध्यमातून निवड होऊन नियुक्त केले जातात, तथापि ही नियुक्ती नवीन नियुक्ती ठरत असल्याने त्यांची वेतननिश्चिती करतांना त्यांचे वेतन अधिव्याख्याता पदावरील किमान वेतनावर निश्चित केले जाते आणि परिणामी, कनिष्ठ महाविद्यालयातून वरिष्ठ महाविद्यालयात येणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या वेतनात त्यामुळे घट होऊन त्यांचे आर्थिक नुकसान होते. मा. लोक आयुक्तांकडे अशा प्रकारची प्रकरणे प्राप्त झाल्यावर त्यांनी असे आदेश दिले की, या प्रकरणी शासनाने जरूर तो निर्णय घेऊन याबाबत आदेश लवकरात लवकर काढावेत. लोकायुक्तांनी असेही म्हटले आहे की, या सर्व प्रकरणांत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ लागू आहे, कारण वरिष्ठ महाविद्यालायांतील/ विद्यापीठांतील शिक्षकांच्या सेवाशर्ती ठरविण्याचा अधिकार राज्य शासनाचा आहे आणि जरी वेतनश्रेणी विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद इत्यादी राष्ट्रीय स्तरावरील संस्थांच्या शिफारसीनुसार आणि विद्यापीठांच्या परिनियमानुसार (Statutes) विद्यापीठे व महाविद्यालयांतील शिक्षकांना लागू केल्या जातात तरी राज्य शासन अनुदान देत असल्यामुळे व शासन निर्णयान्वये वेतनश्रेणी व इतर सेवाशर्तीचे आदेश काढीत असल्याने राज्य शासनाच्या वरील अधिकाराच्या बाबतीत दुमत असू शकत नाही, हे लक्षात घेता या सर्व प्रकरणांत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम २ अनुसार त्या नियमांतील इतर सर्व नियम महाविद्यालयीन व विद्यापीठीय अधिव्याख्यात्यांना आणि त्यावरील पदांना अर्थात प्रपाठक/प्राध्यापक/ प्राचार्य या सर्वांना लागू आहेत. तसेच कनिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांच्या सेवाशर्ती, वेतन इत्यादी देखील राज्य शासनच ठरविते. वरिष्ठ महाविद्यालयांतील अधिव्याख्यात्यांचे पद हे कनिष्ठ महाविद्यालयांतील अधिव्याख्यात्याच्या पदापेक्षा अधिक जबाबदारीचे व कर्तव्याचे आहे. या सर्व बाबींच्या विचारांती शासन खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक आदेश देत आहे. :-

२. कनिष्ठ महाविद्यालयातील अर्हताधारक शिक्षकांची नियुक्ती वरिष्ठ महाविद्यालयांत /विद्यापीठांत इत्यादी मध्ये अधिव्याख्याता व त्यावरील जास्त जबाबदारीची शैक्षणिक पदे यावर विहित निवडपद्धतीच्या माध्यमातून नियुक्ती झाल्यास त्यांच्या वेतनाची निश्चिती करतांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन), नियम १९८१ मधील नियम ११ च्या तरतुदीचा अवलंब करावा.

३. शिक्षण संचालक (उशि) महाराष्ट्र राज्य पुणे यांना विनंती की, त्यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावेत. ज्या प्रकरणांमध्ये वेतन निश्चिती करतांना नियम ११ चा अवलंब केलेला नाही त्या प्रकरणांमध्ये या नियमाचा अवलंब करून प्रकरणे तीन महिन्यांच्या आंत निकाली काढावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(म.अ. सरपोतदार)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

### कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीस वरिष्ठ महाविद्यालयात संरक्षण देणेबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, १९९९*
*बुधवार, दिनांक २४ मार्च १९९९*

**(२१) ३६७६५ सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे, प.म.पाटील :** दिनांक २४ डिसेंबर १९९८ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या तिसऱ्या यादीतील प्रश्न क्रमांक २७२९४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१) कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची वरीष्ठ महाविद्यालयात निवड समितीमार्फत निवड होऊन नियुक्ती होत असल्याने त्याचे वेतन संरक्षित करावे याबाबत प्राप्त झालेल्या माहितीनुसार विचाराधिन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे हे खरे आहे काय?

२) असल्यास, त्यानुसार शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे?

३) अद्याप निर्णय घेण्यात आलेला नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व तो किती कालावधीत घेण्यात येईल?

**श्री. दत्ता राणे :** (१) होय

(२) कनिष्ठ महाविद्यालयातून वरिष्ठ महाविद्यालयात शिक्षक पदावर नियुक्त झाल्यावर त्यांची वेतन निश्चिती कशी करावी याबाबतचे आदेश शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण, विभाग क्रमांक एनजीसी-१२९८/ लोकायुक्त/४५२९/विशि-४, दिनांक १ मार्च १९९९ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत

(३) वरील भाग-२ ला दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने प्रश्न उद्भवत नाही.

*****

### Nagpur University Teachers' Association
### MEETING NOTICE : 1

Dated : 15th April 1999

From :
**Prof. E. H. KATHALE**
Secretary, NUTA
N-162 Reshim Bag, Nagpur 444 009
To,
All the members of the
Nagpur University Teachers' Association

Dear members,

I have the honour to inform you that General Body meeting of the Nagpur University Teachers' Association will be held at 12.00 noon, on the Day and the Date mentioned below.

2. If you propose to move any resolution for the consideration of the General Body, you are requested to send such resolution to me, with a copy to Prof. B.T.Deshmukh, President NUTA, No. 3, Subodh Colony, Near Vidarbha Mahavidyalaya, Amravati 444604 within a period of 10 days from the date of the posting of this Bulletin.

3. It will not be possible to include in the agenda, resolutions received after the due date. So please make it convenient to send such resolutions, if any, within the stipulated time. The place of the meeting will be intimated to you alongwith the agenda.

Thanking you.

Yours faithfully
**Sd/- E. H. Kathale**
Secretary, NUTA.

***Time, Day and Date of the Meeting:***

***12.00 Noon on Sunday, the***

***6th June, 1999***

# महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

***क्रमांक : विपआस - १०९८/१४४/(४५६४)/विशि-४***

*मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२ : दिनांक १ मार्च १९९९*

प्रति,
१. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
३. कुलसचिव, सर्व विद्यापीठे

**विषय : विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम**

कृपया उपरोक्त विषयावरील शासनाचे पत्र क्रमांक : एनजीसी-१२९७/(४४१३)/विशि-४ दिनांक १८ मे १९९८ पहावे.

२. सदर पत्रान्वये विभागीय सहसंचालकांना असे सूचित करण्यात आले होते की, त्यांनी सर्व अधिव्याख्यात्यांच्या असे निदर्शनास आणून द्यावे की, जर सबंधीत अधिव्याख्यात्यांनी वरिष्ठश्रेणी/निवडश्रेणी मिळण्याकरिता आवश्यक असलेले उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले नाहीत तर त्यांना वरिष्ठश्रेणी/निवडश्रेणीचा लाभ दिला जाणार नाही. या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाकडे संपर्क साधण्यात आला होता. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या दिनांक २४.१२.१९९८ च्या पत्र क्रमांक F.3-1/94(PS) अन्वये वेतनश्रेणीत सुधारणा करणे, विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकांच्या नियुक्तीकरिता असणारी किमान शैक्षणिक अर्हता व शिक्षणाचा दर्जा राखण्याकरिता इतर उपाययोजना करणे याबाबत जारी केलेल्या अधिसूचनेची प्रत सर्व विद्यापीठांना पाठविली आहे. या अधिसूचनेमध्ये अधिव्याख्यात्यांना करिअर ॲडव्हान्समेंट योजनेखाली प्रत्येक स्तरावर जे उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणे नियमानुसार आवश्यक आहे त्याची माहिती देण्यात आली असून या अधिसूचनेतील संबंधित परिच्छेदाची प्रत आपल्या माहितीकरिता प्रसृत करण्यात येत आहे.

**7.7.O.** The requirement of participation in orientation/refresher courses/summer institutes, each of at least 3 to 4 weeks duration, and consistently satisfactory performance appraisal reports, shall be the mandatory requirement for Career Advancement from Lecturer to Lecturer (Senior Scale) and from Lecturer (Senior Scale) to Lecturer (Selection Grade). Wherever the requirement of orientation/refresher courses has remained incomplete, the promotions would not be held up but these must be completed by the year 2000.

The requirement for completing these courses would be as follows:

i) For Lecturer to Lecturer (Senior Scale), one orientation course would be compulsory for University and College teachers. Those without Ph.D. would be required to do one refresher course in addition.

ii) Two refresher courses for Lecturer (Senior Scale) to Lecturer (Selection Grade)

iii) The senior teachers like Readers/Lecturers (Selection Grade) and Professors may opt to attend two Seminars/Conferences in their subject area and present papers as one aspect of their promotion/selection to higher level or attend refresher courses to be offered by ASCs for this level.

**7.8.O.** If the number of years required in a feeder cadre are less than those stipulated in this notification, thus entailing hardship to those who have completed more than the total number of years in their entire service for eligibility in the cadre, may be placed in the next higher cadre after adjusting the total number of years.

This situation is likely to arise as, in the earlier scheme, the number of years required in a feeder cadre were much more than those envisaged under this notification.

**11.4.0.** Since the time required for Career Advancement has now been reduced, **an extension may be provided till 31.12.2000 to all candidates for completing refresher courses.**

**11.5.0.** The University may devise a mechanism for ensuring that the Head of the University Department/College Principal sponsors the teacher for the required orientation and refresher course, and such opportunity is not denied to the teacher, except on sufficient grounds to be specified in writing to the univerisity. The university should also bring to the attention of the UGC any complaints received from university or college teachers that they did not get admission to the courses for which they applied with details (name of teacher, name of institution where employed, course applied for, ASC or Department where applied, dates of course and reasons given for refusal).

या सूचनांनुसार ज्या अधिव्याख्यात्यांनी वरिष्ठश्रेणी/निवडश्रेणीकरिता आवश्यक असणारे उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केलेले नाहीत, त्यांना या कारणास्तव जर त्यांनी या पदाकरिता लागणारी एकूण कालावधीची सेवा पूर्ण केलेली असेल तर स्थाननिश्चिती देण्याचे रोखून ठेवू नये. त्यांची स्थाननिश्चिती त्याप्रमाणे करण्यात यावी मात्र अशा अधिव्याख्यात्यांनी ३१.१२.२००० पर्यंत उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करणे आवश्यक आहे.

शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग क्रमांक : एनजीसी-१२९५ /५१३७१/(३०७८)/विशि-४ दिनांक १३ फेब्रुवारी, १९९७ अन्वये स्थानापन्न निवडश्रेणी अधिव्याख्यात्यांना उजळणी अभ्यासक्रम कार्यक्रम उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वरील सूचनेनुसार ज्या अधिव्याख्यात्यांना त्यांची एकूण कालावधी सेवा विचारात घेता निवडश्रेणीत स्थाननिश्चिती दिली जाईल त्यांनी ३१.१२.२००० पूर्वी उजळणी प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण करावेत. विद्यापीठ अनुदान आयोगाची मार्गदर्शक तत्त्वे पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारसींची अंमलबजावणी करतांना पुन्हा प्रसृत करण्यात येतील. दरम्यानच्या काळात उजळणी प्रशिक्षण अभ्यासक्रमाबाबत वर उल्लेख केल्याप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सर्व महाविद्यालयांना आवश्यक त्या सूचना आपल्या स्तरावर पुन्हा एकदा देण्यात याव्यात.

**(म.अ.सरपोतदार)**
उपसचिव, महाराष्ट्र शासन

*****

---

**महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना रिफ्रेशर कोर्सेस करण्याची संधी न देता त्यांची रोखण्यात आलेली किंवा उशिरा देण्यात आलेली पदोन्नती.**

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, १९९९*
*बुधवार, दिनांक ७ एप्रिल १९९९*

**(२१) ३३६९९ सर्वश्री प.म.पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे :** तारांकित प्रश्न क्रमांक २७३१२ ला दिनांक २९ जुलै १९९८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१) महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षकांना रिफ्रेशर कोर्सेस करण्याची संधी उपलब्ध करून न देता त्यांची रोखण्यात आलेली किंवा उशिरा देण्यात आलेली पदोन्नती देणे याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा सल्ला शासनाला प्राप्त झाला हे खरे आहे काय?

२) असल्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने २४ डिसेंबर १९९८ रोजीचे जे "युजीसी नोटीफिकेशन" उच्च शिक्षण सचिवांना पाठविले त्याच्या परिच्छेद ७.७ मध्ये "रिफ्रेशर कोर्सेस पूर्ण न केल्याच्या कारणावरून कोणाचीहि पदोन्नती रोखू नका. मात्र सन २००० पावेतो हे कोर्सेस पूर्ण करण्याचे बंधन टाका" असा निदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेला आहे हे खरे आहे काय?

३) असल्यास याबाबतची सद्यस्थिती काय आहे?

**श्री. दत्ता राणे :** (१) होय

(२) होय

(३) शासन पत्र क्रमांक विपआस-१०९८/१४४/(४५६४)/विशि-४ दिनांक १ मार्च १९९९ अन्वये सर्व विद्यापीठे व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत

*****

*एमफक्टोचे माजी अध्यक्ष, प्रा. ई.एन.मांजरेकर (मुंबई) यांचे 'प्राध्यापक व एकविसावे शतक' या विषयावर एस.एच. केळकर महाविद्यालय, देवगड येथे, २० डिसेंबर, ९८ रोजी झालेल्या परिषदेमधील एक महत्वाचे भाषण*

# DUTIES & RIGHTS OF TEACHERS

***by Prof. E.N.Manjrekar***

**Introduction**

1.1. I have recast the subject of the Talk given to me. I have called it "Duties and Rights of Teachers''. Duties come first in life. **Only those who perform their duties can claim rights.** Duty to students, to the institution, to education, and through these to the society at large is what a teacher has to perform.

1.2 . To demand rights without performing duties is to be selfish in the extreme. If you carry out your duties to the full and then claim rights you can win sympathy from the society. If the institution and teachers have **a common goal, viz. to impart good education,** rights will be easily granted; but if the situation is different conflict arises. **Then it becomes the duty of teachers to fight for their rights.**

1.3 . Rights are to be enjoyed not for the sake of rights. Rights do not exist in a vacuum. They are absolutely required for the existence of a teacher as teacher. To be able to teach well a teacher needs academic, social, political and economic rights. **When any or all of these are denied to him he cannot teach; certainly he cannot teach well.**

1.4 . **In any unjust society conflict between the teacher and the society in regard to his rights is inevitable.** A good teacher will not, nay, should not flinch from such a conflict and, if necessary, in this he may unhesitatingly take the help of his Union.

**A Good Teacher Defined**

2.1 . **A good teacher is one**(a) who teaches his subject well;(b) who teaches his subject with a view to preparing his student for their life ahead;(c) who prepares his students to be ideal citizens; and (d) who makes them fit enough to make some contribution to humanity, however small.

2.2 . **This, I know, is a tall order.** But a good teacher will certainly **at least attempt to qualify** himself to satisfy the description of a good teacher given above.

2.3 . Let me be very frank : **Not all teachers are really good teachers.** Unfortunately to-day, for various reasons which I need not enumerate here, one becomes a teacher though one's place in life is elsewhere. **My idea of a teacher is very simple** : He is one who has initially taken a course in the **subject of his choice, studied it well, has aptitude for teaching** and, what is more important, **loves teaching.**

2.4 . If there are to-day some teachers in the age group of 25 to 32 years who by a thorough introspection have come to the conclusion that they are not fit enough to be teachers, their duty to the society and to themselves is to resign their present post and seek an opening in some other field. I said, "their duty to themselves", because **man's primary duty is to himself.** One cannot

---

**दिनांक १.१.१९९६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/होणाऱ्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचे "निवृत्तीवेतनविषयक लाभ" निश्चित करणेबाबत अंतरिम उपाययोजना**

***महाराष्ट्र शासन : वित्त विभाग,***

***शासन परिपत्रक क्रमांक सेनिवे-१०९९/३४/सेवा-४ : मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक २४ मार्च १९९९***

**परिपत्रक** : शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपूर-१२९८/प्र.क्र. १३/९८/सेवा-१०, दिनांक १० डिसेंबर, १९९८ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या दिनांक १ जानेवारी १९९६ पासून सुधारित करण्यात आल्या आहेत. या वेतनश्रेणी सुधारणेच्या परिणामी जे शासकीय कर्मचारी १९९६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झाले आहेत किंवा होतील त्यांचे "निवृत्तीवेतनविषयक लाभ" महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, १९९८ नुसार निश्चित झालेले सुधारित वेतन विचारात घेऊन, निश्चित करावे किंवा कसे, याबाबतचा प्रश्न शासनाच्या स्वतंत्रपणे विचाराधीन आहे. तथापि हा निर्णय घेण्यास काही कालावधी लागण्याची शक्यता आहे, हे लक्षात घेता व त्यामुळे सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची आर्थिक कुचंबणा होऊ नये, यादृष्टीने शासन खालील आदेश देत आहे.

"सुधारित वेतनश्रेणीत वेतन घेत असलेले जे शासकीय कर्मचारी दिनांक १ जानेवारी १९९६ रोजी किंवा त्या दिनांकानंतर सेवानिवृत्त झाले आहेत किंवा होतील त्यांना संबंधित कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर त्वरित "तात्पुरत्या स्वरुपात" असुधारित वेतनश्रेणीतील वेतन विचारात घेऊन सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या तरतुदी व त्यासंबंधातील सध्याच्या इतर आदेशांच्या तरतुदीनुसार निवृत्तीवेतनविषयक लाभ (मासिक निवृत्तीवेतन, उपदान, निवृत्तीवेतनाची अंशराशीकृत रक्कम इत्यादी) मंजूर करावे. हे लाभ मंजूर करतांना सर्व विभाग/कार्यालय प्रमुखांनी प्रकरणपरत्वे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या यथास्थिती, नियम १२६ किंवा १३० अंतर्गत "तात्पुरते निवृत्तीवेतन व उपदान" यांचे प्रदान करताना जी कार्यपद्धती अवलंबिली जाते, त्याच कार्यपद्धतीचा अवलंब करावा. या आदेशानुसार वरीलप्रमाणे निवृत्तीवेतननिषयक लाभ प्रदान करण्यासाठी संबंधित महालेखापालांची प्राधिकृती आवश्यक असणार नाही."

२. यासंदर्भात शासनाकडून सुधारित आदेश निर्गमित केले जाईपर्यंत हे आदेश लागू रहातील.

३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९५२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार याचा वापर करून शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांमधील ज्या कर्मचाऱ्याचे वेतन उपरोक्त अधिसूचनेनुसार दिनांक १ जानेवारी १९९६ पासून सुधारण्यात आलेले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या प्रकरणीही लागू राहील.

४. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तीवेतनाची योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये व कृषी विद्यापीठे यामधील ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन उपरोक्त अधिसूचनेनुसार दिनांक १ जानेवारी १९९६ पासून सुधारण्यात आलेले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या प्रकरणीही वरील निर्णय लागू राहील

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(रवी भू. बुद्धिराजा)**
शासनाचे प्रधान सचिव

be happy unless throughout his entire life he has opportunity to do the work of his choice and the work for which he is really suited.

2.5 . Unfortunately in the field of higher education **to-day we find many students who have no aptitude for learning and many teachers who have no aptitude for teaching.** However, I refuse to be cynical or a bird of ill-omen; so, I will address all of you who have taken to the teaching profession presuming that you are all good teachers or at least desire to be good teachers.

**Minimum Expectations from Teachers**

3.1 . If I were the Head of an educational institution the **minimum that I would expect from a teacher would be -**

i) that he is on leave only when it is absolutely necessary;

ii) that when he signs the muster he takes all the classes without combining divisions on the ground that attendance in each division is less;

iii) that before he goes to his class he is fully prepared for his lecture or for the practical he is conducting; and

iv) that he teaches for the full length of time prescribed, i.e.50 minutes for Lecture, and 2 or 3 hours as prescribed for practical remaining throughout on his toes.

***अधिव्याख्याता (वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी) पदावर स्थाननिश्चिती करण्यासाठी ग्राह्य धरावयाची सेवा.***

## महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग

***शासन निर्णय क्र. जुएसजी १२९८/३४०२६/(४७१२)/विशि-४***

***मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ० ३२ : दिनांक ६ मार्च, १९९९***

**वाचा** : सचिव, विद्यापीठ आयोग यांचे पत्र क्रमांक एफ ३.१/९४ (पीएस) दिनांक २४ डिसेंबर १९९८.

**शासन निर्णय** : विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या पत्र क्र. एफ ३.१/९४(पीएस), दिनांक २४ डिसेंबर, १९९८ अन्वये विद्यापीठीय व महाविद्यालयातील शिक्षक पदावर नियुक्तीसाठी असणारी किमान शैक्षणिक अर्हता आणि शिक्षणाचा दर्जा राखण्यासाठी करावयाची उपाययोजना याबाबतच्या सूचना सर्व विद्यापीठांना व राज्य शासनास दिलेल्या आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने त्यांच्या १९९८ च्या अधिसूचनेमध्ये क्र. ८ अंतर्गत वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी मधील स्थान निश्चिती करण्याकरिता कोणत्या प्रकारची सेवा ग्राह्य धरावी याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. **या सूचनांची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.**

२. वरील सूचनांतील सूचना क्र. ८.६.० मधील एक वर्षापेक्षा जास्त काळ केलेली तदर्थ सेवा खालील परंतुकानुसार वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी स्थान निश्चिती करताना परिगणीक करता येईल असे कळविले आहे.

अ) तदर्थ सेवा ही एक वर्षापेक्षा जास्त कालावधीची होती.

ब) उमेदवारांची अधिव्याख्याता पदावरील नियुक्ती विहित केलेल्या निवडसमितीच्या शिफारसीनुसार करण्यांत आली होती.

क) उमेदवारांची तदर्थ सेवेला जोडून त्यात कोणताही खंड न पडता स्थायी पदावर नियुक्ती झाली होती.

३. सलग सेवेची परिगणना करताना सहा महिन्यापर्यंतच सेवाखंड क्षमापित करण्याबाबतचे शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) यांचे आदेश लक्षात घेऊन व औपचारिकता म्हणून अधिव्याख्यात्यांना सेवेत दिलेला खंड हा स्थान निश्चितीकरता खंड म्हणून विचारात घेण्यात येऊ नये.

४. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सूचना विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

ज्या अधिव्याख्यात्यांची सेवा स्थान निश्चितीकरिता विचारात घ्यावयाची आहे त्यांनी अधिव्याख्याता पदावर नियुक्त होताना विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेली किमान पात्रता धारण करणे आवश्यक आहे. ज्या अधिव्याख्यात्यांनी ही किमान पात्रता धारण केलेली नसल्याने (नेट/सेट परीक्षा उत्तीर्ण नसल्याने वा ती पास होण्यातून सूट मिळाली नसल्याने) त्यांची सेवा तदर्थ म्हणून ठरविण्यात आलेली आहे, अशा अधिव्याख्यात्यांची सेवा वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी स्थाननिश्चिती करण्याकरता ग्राह्य धरण्यात येऊ नये. याबाबतचा खुलासा केंद्र शासनाकडून मागविण्यात आलेला असून तो प्राप्त झाल्यावर याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील.

५. शासकीय सेवेत येणाऱ्या अधिव्याख्यात्यांची नियुक्ती महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या शिफारसीनुसार नियमित स्वरुपात करण्यात येते. परंतु अशा नियुक्त्या होण्यापूर्वी मागासवर्गीयासाठी राखीव असणाऱ्या तसेच आयोग पुरस्कृत उमेदवार उपलब्ध होईपर्यंत सर्वसाधारण पदावर विद्यापीठ अनुदान आयोगाने ठरवून दिलेल्या किमान पात्रताधारक उमेदवारांची नियुक्ती तदर्थ स्वरूपात या करीता असलेल्या निवड समितीच्या शिफारसीनुसार केली जाते. असे अधिव्याख्याता लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून कालांतराने नियमित सेवेत आल्यास वरिष्ठ श्रेणी/निवडश्रेणी स्थाननिश्चिती करताना त्यांची पूर्वीची सलग तदर्थ नियुक्ती सेवा विचारात घेणे आवश्यक आहे.

६. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती करण्यात येते की या सूचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल या बाबतची खातरजमा करून घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

**(अ.मा.भट्टलवार)**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**UGC NOTIFICATION ON THE REVISION OF PAY SCALES, MINIMUM QUALIFICATIONS FOR THE APPOINTMENT OF TEACHERS IN THE UNIVERSITIES AND COLLEGES AND OTHER MEASURES FOR THE MAINTENANCE OF STANDARDS, 1998**

**8.O.O. COUNTING OF PREVIOUS SERVICE**

Previous service, without any break as a Lecturer or equivalent, in a university, college, national laboratory, or other scientific organisations, e.g. CSIR, ICAR, DRDO, UGC, ICSSR, ICHR and as a UGC Research Scientist, should be counted for placement of lecturer in Senior Scale/ Selection Grade provided that:

**8.1.O.** The post was in an equivalent grade/scale of pay as the post of a Lecturer,

**8.2.O.** The qualifications for the post were not lower than the qualifications prescribed by the UGC for the post of Lecturer,

**8.3.O.** The candidates who apply for direct recruitment should apply through proper channels,

**8.4.O.** The concerned Lecturers possessed the minimum qualifications prescribed by the UGC for appointment as Lecturer,

**8.5.O.** The post was filled in accordance with the prescribed selection procedure as laid down by the University/State Government/Central Government/ Institution's regulations;

**8.6.O.** The appointment was not ad-hoc or in a leave vacancy of less than one year duration. Adhoc service of more than one year duration can be counted provided-

(a) the ad hoc service was of more than one year duration;

(b) the incumbent was appointed on the recommendation of duly constituted Selection Committee; and

(c) the incumbent was selected to the permanent post in continuation to the ad hoc service, without any break.

3.2 . This is minimum that a teacher should do. **There is no maximum that can ever be prescribed.** Maximum is determined by the quality of a teacher, his will to teach and his capacity to love his subject and to love his students, as students.

3.3 . There's a story about Albert Einstein when he had already formulated the Theory of Relativity and became a celebrity : Once he had been invited to a great musical concert. He loved music tremendously. Just when the concert was about to begin he happened to notice that a young boy of 16 was just not interested in the concert but preferred to spend the time in the in-house-library reading. Einstein sacrificing the concert spent two full hours playing for the young boy recorded music on gramophone starting from the most elementary music and then gradually rising to the highly classical. Each time the piece of music ended he asked the young boy. "Could you like anything in the musical piece played?" For some time the boy's honest answer was a clear "No," but as the exercise progressed Einstein noticed that pleasure was bit large on the boy's face.

By the time the musical concert Einstein was supposed to attend was over this young boy of 16 had learned, though in a small way, to appreciate and love music.

**महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
***क्रमांक एनजीसी-१२९९/(४७४०)/विशि-४***
***मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२***
**दिनांक : १ मार्च, १९९९**

प्रति,
शिक्षण संचालक,
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पूणे.

**विषय : प्राचार्य पदावरील नियुक्त्या वेतन निश्चितीबाबत**

दिनांक ३ व ४ नोव्हेंबर, १९९८ रोजी मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण व मा. अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत झालेल्या चर्चेच्या वेळी प्राचार्य पदावर नियुक्ती झाल्यानंतर करावयाच्या वेतन निश्चितीच्या अनुषंगाने चर्चा झाली. या संदर्भात हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, सर्व संबंधित नियम, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ या सर्व नियुक्त्यांना लागू आहेत. कारण अनुदानित/विना अनुदानित आणि शासकीय संस्था यामधील प्राचार्यांची वेतनश्रेणी ही विद्यापीठ अनुदान आयोगाने चौथ्या वेतन आयोगाच्या केलेल्या शिफारसीच्या संदर्भात त्यावेळी राज्य शासनाने मान्य केली होती. अर्थात प्रत्येक प्राचार्यांची वेतनश्रेणी राज्य शासनाचे अधिकाराखाली ठरवून दिली आहे.

